शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
07 Apr 2026 - Page 8 Jalgaon

# आदर्श शिक्षक स.ध.भावसार यांनी केला लक्ष्मी शिंपीचा गौरव



**पारोळा । प्रतिनिधी**

धुळे येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या कर्मवीर पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष संगणक शास्त्र विभागातील विद्यार्थिनी लक्ष्मी वासुदेव शिंपी हीस सायबर सुरक्षा जागृती उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय बेस्ट अक्टिव्हीटी डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याची वृत्तपत्रातील बातमी वाचून राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श निवृत्त शिक्षक सदानंद धडू भावसार यांना विशेष आनंद व अभिमान वाटल्याने तिला आपल्या निवासस्थानी बोलावून अभिनंदन पत्र, गौरव पत्र व रोख बक्षीस रुपये २५० /- दोनशे पन्नास मात्र देऊन सन्मानित केले आणि पुढील वाटचाल व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व शुभ आशीर्वाद दिले. तर लक्ष्मी शिंपी व तिच्या कुटुंबीयांनी भावसार सरांविषयी कृतज्ञता व्यक्त करुन आभार मानले. भावसार सर यांना पत्र लेखनाचा छंद असून आतापर्यंत तब्बल ५१ हजार ४४९ पत्रे पाठवली आहेत. तसेच यशवंत विद्यार्थ्यांचा गौरव व गुणी जनांचा सत्कार हे देखील त्यांचे उपक्रम आहेत.आजपर्यंत त्यांनी १०९२ यशवंत विद्यार्थी/ गुणी जनांचा भावपूर्ण सत्कार केला आहे. त्यांच्या या अनोखा छंद व उपक्रमाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आनंद व्यक्त करुन धन्यवाद दिले आहेत.